ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र राज्य

**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, बेलापूर नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्रमांक -०२२-२७५६०३११ ई - मेल directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र. राज्य योजना/1408 /२०१८ दिनांक : ०६.०८.२०१८

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, (सर्व)

विषय : पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत सन २०१६-१७ चे उद्दिष्टाबाबत.

संदर्भ : १) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्रआयो-२०१७/प्र.क्र.६०/योजना-१०, दि. १४ जुलै, २०१७
२) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. ३९९/पंदिउसुउ-५०%/२०१७ दि. २८.०८.२०१७
३) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : पीडीयु-२०१८/प्र.क्र.२४३/योजना-१०, दि. ६ जुलै, २०१८

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना राज्यात लागू करण्यात आलेली असून संदर्भ क्र. २ नुसार राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून जिल्हयास संवर्गनिहाय भौतिक व आर्थिक उद्दिष्ट वाटप करण्यात आलेले आहे.

तसेच संदर्भ क्र. ३ अन्वये, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये वाटप करण्यात आलेले संवर्गनिहाय भौतिक उद्दिष्ट साध्य केले असल्यास, परंतु संबंधित संवर्गामध्ये वाटप केलेला निधी शिल्लक असल्यास, या जिल्ह्यांमध्ये शिल्लक निधीच्या मर्यादेत अतिरिक्त भौतिक उद्दिष्ट साध्य करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

या योजनेंतर्गत सन २०१६-१७ करीता १२००० इतके उद्दिष्ट प्राप्त झाले असून अद्यापपर्यंत केवळ १५०० इतके उद्दिष्ट साध्य झालेले आहे.

विभागस्तर व जिल्हास्तर आढावा बैठकीच्या दरम्यान बहुतांश जिल्ह्यांमध्ये योजनेंतर्गत साध्य उद्दिष्ट निरंक दिसून येत आहे. तसेच काही जिल्ह्यांमध्ये अतिरिक्त उद्दिष्ट साध्य झालेले आहे.

तरी राज्यस्तरावर योजनेची सांगड घालण्याकरीता ज्या जिल्ह्यांना उद्दिष्ट समर्पित करावयाचे आहे किंवा ज्यांना अतिरिक्त उद्दिष्टाची आवश्यकता आहे. त्यांनी सोबत प्रपत्रातील माहिती ब्लॉग स्पॉटवर भरावी व त्यांची प्रत या कार्यालयास सादर करावी.

सोबत : प्रपत्र अ व ब

६/८/२०१८

धनंजय माळी (भा.रा.से.)
संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

प्रत : १) उपायुक्त (विकास) (सर्व) यांना माहितीसाठी.
२) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सर्व) यांना पुढील कार्यवाहीस्तव.

D:\Surekha\SUREKHA-1\PDU\PDU CERTIFICATE 1 & 2 LETTER.docx

# पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना २०१६-१७ अहवाल (भौतिक)

## अ) भौतिक उद्दिष्ट

| उद्दिष्ट प्राप्त | | | उद्दिष्ट साध्य | | | शिल्लक उद्दिष्ट | | | समर्पित करावयाचे उद्दिष्ट | | | अतिरिक्त मागणी उद्दिष्ट | | | समर्पित अथवा अतिरिक्त मागणीचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर | |

## ब) आर्थिक उद्दिष्ट

(रक्कम हजारात)

| उद्दिष्ट प्राप्त | | | उद्दिष्ट साध्य | | | शिल्लक उद्दिष्ट | | | समर्पित करावयाचे उद्दिष्ट | | | अतिरिक्त मागणी उद्दिष्ट | | | समर्पित अथवा अतिरिक्त मागणीचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर | |